महाराष्ट्र शासन,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
उपसंचालक कार्यालय,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, नाशिक विभाग, नाशिक.
एन.डी.पटेल रोड, एस.टी. वर्कशॉप जवळ, नाशिक-४२२००१
टेलीफोन- ०२५३-२४५२५५४, ०२५३-२५०४९८४
E-mail: dydirnashik.gsda@maharastra.gov.in, ddgsdansk@yahoo.co.in.

जा.क्र- उपसं/भूसवियं/ना/भा.वाहन/ १७३६ /२०२२ दिनांक- 19 SEP 2022

# दरपत्रक सुचना

विषय- प्रयोगशाळा सनियंत्रणाकरीता भाडेतत्त्वावरील वाहन लावणे बाबत.
(माहे ऑक्टोबर २०२२ ते माहे मार्च २०२३ या सहा महिन्याकरीता)

उपसंचालक कार्यालय, भू.स.वि.यं, नाशिक कार्यालय अधिनस्त विभागीय प्रयोगशाळेसाठी जिल्हा व उपविभागीय प्रयोगशाळा सनियंत्रणाकरीता माहे ऑक्टोबर २०२२ ते मार्च २०२३ या सहा महिन्याच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर एक वाहन लावणे प्रस्तावीत आहे. त्याकरीता मोहोरबंद पाकीटात दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी आपण आपले मोहोरबंद दरपत्रके उपसंचालक कार्यालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, एन.डि. पटेल रोड, एस.टी. वर्कशॉप समोर, शिंगाडा तलाव, नाशिक ४२२१०१ या पत्त्यावर दि. २९/०९/२०२२ पर्यंत रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत सादर करु शकता. कृपया आपल्या अटी व शर्ती नमूद कराव्यात.

कार्यालयाच्या अटी आणि शर्ती खालिल प्रमाणे.

१. भाडेतत्त्वावर वाहन पुरवठा करण्यासाठी नमुद करावयाचे दर हे प्रती वाहन, प्रती महिना सर्व करासहित नमुद करावेत.
२. वाहनाची मासिक धाव अंदाजे २००० कि.मी. इतकी गृहीत धरुन उक्त दर सर्व करासहीत कार्यालयास सादर करावे.
३. आपातकालीन परिस्थितीत वाहनाची धाव २००० कि.मी. पेक्षा जास्त झाल्यास २००० कि.मी. ते २५०० कि.मी. पर्यंतचे आपले प्रती कि.मी. किमान दर नमुद करावेत.
   त्याचप्रमाणे २५०० कि.मी. अधिक धावेपेक्षा जास्त धाव झाल्यास त्याचे ही प्रती कि.मी. दर नमुद करावे.

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार | वाहनाचा क्रमांक | वाहनाचे बनावट वर्ष | बनावट | २००० कि.मी. पर्यंत सरासरी दर | २००० कि.मी. ते २५०० कि.मी. सरासरी दर |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

४. सदर वाहन हे नाशिक जिल्ह्यातील (MH-१५) असणे आवश्यक आहे.
५. वाहन शासकीय कामासाठी भाडेतत्त्वावर वापरायचे असल्याने मोटार वाहन कायदा १९८८ च्या अधिनियमातील तरतुदीनुसार वाहनास वाहतूकीचा परवाना (परमीट) असणे आवश्यक आहे.
६. सदर वाहन हे पाच वर्षापेक्षा जूने नसावे. वाहनाचा प्रकार सेडान किंवा एस.यु.व्ही असणे अपेक्षीत आहे.
७. सदर वाहन नाशिक विभागातील नाशिक, धूळे, नंदूरबार, जळगाव व अहमदनगर या जिल्ह्यात व महाराष्ट्रात इतर भागात क्षेत्रीय / प्रशासकीय कामासाठी वापरण्यात येईल.

८. वाहनाची किरकोळ अथवा मोठ्या स्वरुपाची दुरुस्ती करणे ही वाहन पुरवठादाराची जबाबदारी राहील, वाहन दुरुस्तीच्या कालावधीत वाहन पुरवठादाराने पर्यायी वाहन उपलब्ध करुन द्यावे लागेल. वाहन वापराच्या कालावधीमध्ये झालेल्या अपघातास सदर कार्यालय कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही त्याची सर्वस्वी जबाबदारी वाहनमालकाची राहील व कोणतीही नुकसान भरपाई बाबत कार्यालयामार्फत अदा करणेची मागणी करता येणार नाही.

९. वाहनाचे सर्व कागदपत्र उदा. रजिस्ट्रेशन पुस्तक, कराधान पुस्तक, वाहनाचा विमा, वाहतूक परवान्याची कागदपत्रे व वाहनचालकाचा वाहन चालविण्याचा परवाना इ. कागपत्रांच्या साक्षांकीत प्रती वाहन पुरवठादारास सादर करणे बंधनकारक राहिल.

१०. भाडेतत्त्वावर वाहन पुरविणा-या पुरवठादाराने महिन्याचे देयक कार्यालयास दरमहा सादर करावे लागेल व त्या सोबत संपूर्ण महिन्याची फिरतीच्या नोंदीचा गोषवारा सादर करणे बंधनकारक राहिल. त्यावर फिरती करणारे अधिकारी / कर्मचारी यांची दैनिक फिरती नोंदीवर स्वाक्षरी घेऊन देयकासोबत जोडणे आवश्यक राहिल. फिरस्ती दरम्यान लागणारा पथकर (टोलनाका) वाहन पुरवठादाराने भरावे व टोल पुराव्याच्या पावत्या देयकासोबत जोडून महिन्याच्या देयकासोबत प्राप्त करुन घ्यावा. वाहनास Fasttag असणे अनिवार्य आहे अन्यथा टोलचे देयक अदा केले जाणार नाही.

११. भाडेतत्त्वावरील वाहन पुरवठा करणा-या ज्या वाहन पुरवठादाराचे कंत्राटी दर मंजूर होतील त्यांना मुद्रांक शुल्क नियमानूसार जी रक्कम निश्चित होईल त्या रक्कमेच्या स्टॅम्पपेपरवर अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा करुन द्यावा लागेल.

१२. करारातील कोणत्याही अटीचा भंग झाल्यास करार कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार कार्यालयास राहतील. व तसेच शासनाच्या धोरणामध्ये काही बदल झाल्यास अथवा काही अपरिहार्य कारणास्तव आवश्यकता भासल्यास कुठलेही कारण न देता वाहनासाठी केलेला करारनामा संपुष्ठात आणण्याचा अधिकार या कार्यालयाकडे राखून ठेवला आहे.

उपसंचालक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
नाशिक विभाग, नाशिक.